क्रमांक : १६८२८ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२२.

:: **परिपत्रक** ::

**विषय** : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे सुधारित विवरणपत्र

संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १२६५८/ई-१, दि. १६ जून, २०२२

**या सचिवालयाचे संदर्भाधीन परिपत्रकामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.**

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे विधान भवन, मुंबई येथे होणारे पूर्वनियोजित दुसरे (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ ऐवजी **बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार आहे**. त्यानुसार बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या अधिवेशन कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तराबाबतची माहिती दर्शविणारे सुधारित विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून या सचिवालयाच्या mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **त्याअनुषंगाने मंत्रालयीन विभागांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे :-**

(१) **महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मा.मंत्री महोदयांना नेमून देण्यात आलेले सुधारित दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये व मंत्रालयीन विभागास नेमून देण्यात आलेले सुधारित दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (५) मध्ये दर्शविण्यात आले आहेत.**

(२) **तारांकित प्रश्नांची उत्तरे QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने तसेच छापील स्वरुपात प्रत्येकी ३ (तीन) प्रतीमध्ये विहित मुदतीत या सचिवालयाकडे पाठविण्यात यावीत.**

**(राजेश तारवी)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(३) मा.मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

# महाराष्ट्र विधानपरिषद
## द्वितीय (पावसाळी) अधिवेशन, २०२२
## तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक तसेच विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे सुधारित विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | उत्तराचा पुर्वीचा वार व दिनांक (३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक (४) | विभागाकडून उत्तर येण्याचा सुधारित वार व दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | सोमवार, दि.१८ जुलै, २०२२ | सोमवार, दि.२२ ऑगस्ट, २०२२ | मंगळवार, दि.१६ ऑगस्ट, २०२२ |
| दोन | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | मंगळवार, दि.१९ जुलै, २०२२ | मंगळवार, दि.२३ ऑगस्ट, २०२२ | बुधवार, दि.१७ ऑगस्ट, २०२२ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण,अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री<br>(४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | बुधवार, दि.२० जुलै, २०२२<br>बुधवार, दि.२७ जुलै, २०२२ | बुधवार, दि.१७ ऑगस्ट, २०२२<br>बुधवार, दि.२४ ऑगस्ट, २०२२ | शुक्रवार, दि.१२ ऑगस्ट, २०२२<br>गुरुवार, दि.१८ ऑगस्ट, २०२२ |
| चार | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) शालेय शिक्षण मंत्री<br>(४) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(५) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(६) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री<br>(७) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार मंत्री | गुरुवार, दि.२१ जुलै, २०२२<br>गुरुवार, दि.२८ जुलै, २०२२ | गुरुवार, दि.१८ ऑगस्ट, २०२२<br>गुरुवार, दि.२५ ऑगस्ट, २०२२ | शुक्रवार, दि.१२ ऑगस्ट, २०२२<br>गुरुवार, दि.१८ ऑगस्ट, २०२२ |